सन २०१७-१८ च्या टंचाई कालावधीसाठी यवतमाळ शहराला पिण्याच्या पाण्याच्या टंचाई अंतर्गत तातडीच्या पाणी पुरवठा योजनेस प्रशासकीय मान्यता देणेबाबत

महाराष्ट्र शासन

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

शासन निर्णय क्रमांकः टंचाई २०१८/प्र.क्र. ११ /पापु १४

जी. टी. रुग्णालय संकुल, ७ वा मजला,
मंत्रालय, मुंबई ४०० ००१
दिनांक : ०६ फेब्रुवारी, २०१८

<u>वाचा</u> :-

१) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्रमांक: टंचाई २००८/प्र.क्र. १४९/पापु १४, दिनांक २१.०८.२००९
२) जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचे क्रमांक: अका/नपाप्र/कावि/१९,२०,२१/ २०१८ दिनांक ०२.०१.२०१८ चे पत्र.
३) विभागीय आयुक्त, अमरावती यांचे क्रमांक: प्रासंनप/सलेअ-३/कावि-०५/२०१८, दिनांक १६.०१.२०१८ चे पत्र
४) शासन पत्र, क्रमांक टंचाई २०१७/प्र.क्र.१७०/पापु १४, दिनांक ०५.०२.२०१८ (बैठकीचे इतिवृत्त)

<u>प्रस्तावना</u> –

विभागीय आयुक्त, अमरावती यांनी सन २०१७-१८ च्या टंचाई कालावधीसाठी यवतमाळ शहराला पिण्याच्या पाण्याच्या टंचाई अंतर्गत तातडीच्या पाणी पुरवठा योजनेच्या रुपये १६६.७९ लक्ष इतक्या रकमेच्या कामास प्रशासकीय मंजूरी देण्याबाबत प्रस्ताव शासनास सादर केला आहे. सदर प्रस्ताव नागरी तथा ग्रामीण क्षेत्रातील पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ विहित आर्थिक व भौतिक निकषाबाहेरील तातडीच्या पाणीपुरवठा योजनांना/उपाययोजनांना प्रशासकीय मंजूरी देण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांच्या अध्यक्षतेखालील स्थायी समितीच्या दिनांक ०५.०२.२०१८ रोजी झालेल्या बैठकीत मान्यतेसाठी विचारात घेण्यात आला.

विभागीय आयुक्त अमरावती यांच्याकडून प्राप्त झालेल्या सदर प्रस्तावात चापडोह धरणाच्या मृत साठयातून (०.९३ द.ल.घ.मी.) व निळोणा धरणाच्या मृत साठयातून (१.०४ द.ल.घ.मी.) साठा उचलता येणे शक्य आहे. त्याकरिता धरणाच्या भिंतीजवळ पाण्यात १.०० लक्ष लिटर्स पाणी उचलण्याची क्षमता असलेले एकूण १२ तरंगते पंप बसवून चापडोह धरणावर ३१५ मी.मी. व्यासाच्या प्रत्येकी ५०० मीटर लांबीच्या दोन पाईपलाईन व निळोणा धरणावर प्रत्येकी १३०० मीटर लांबीच्या दोन पाईप लाईन टाकून पाणी पुरवठा विहिरीजवळ आणता येवू शकते. सदर प्रस्तावावर दि. ०५.०२.२०१८ रोजीच्या स्थायी समितीच्या बैठकीत सविस्तर चर्चा होऊन प्रस्तावातील रु. १७.५ % ईटीपी (ETP) ऐवजी ४ % दराने देण्यास मान्यता देऊन स्थायी समितीने रु. १,४७,६३,१३८/- एवढ्या किंमतीच्या प्रस्तावास मंजूरी दिली. त्या अनुषंगाने सदर प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

प्रस्तावनेत नमूद केलेली वस्तुस्थिती विचारात घेऊन सन २०१७-१८ च्या टंचाई कालावधीसाठी यवतमाळ शहराला पिण्याच्या पाण्याच्या टंचाई अंतर्गत तातडीच्या पाणी पुरवठा योजनेच्या रुपये १,४७,६३,१३८/- (रु. एक कोटी सत्तेचाळीस लाख त्रेसष्ट हजार एकशे अडतीस फक्त) किंमतीच्या प्रस्तावास या आदेशान्वये खालील अटींच्या अधिन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे :-

१) जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी यवतमाळ शहरात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली असल्याचे सर्व प्रथम घोषित करावे.

२) सदर योजनेच्या किंमतीच्या एकूण रुपये १,४७,६३,१३८/- खर्चाच्या ९०% म्हणजेच रुपये १,३२,८६,८२४/- इतके अनुदान शासनाद्वारे उपलब्ध करुन दिले जाईल. उर्वरीत रक्कम म्हणजेच योजनेच्या १०% रुपये १४,७६,३१४/- लक्ष एवढी रक्कम लोकवर्गणी म्हणून नगर परिषद, यवतमाळ यांनी भरावयाची आहे.

३) सदर योजनेची १० टक्के लोकवर्गणी नगरपरिषदेने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे भरणा केल्याशिवाय योजनेतील कार्यारंभ आदेश देण्यात येवू नयेत.

४) सदर योजनेची अंमलबजावणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणमार्फत करण्यात यावी.

५) सदर योजनेची कामे विहित पध्दतीने ई-निविदा मागविण्यात येऊन करावीत. योजनेचे काम मान्यता प्राप्त किंमतीमध्येच पूर्ण होईल याची दक्षता घ्यावी.

६) योजनेची निविदा अल्प मुदतीची (७ दिवस) काढण्यास परवानगी देण्यात येत आहे.

(७) निविदा प्रक्रीया २३ फेब्रुवारी, २०१८ पर्यंत पूर्ण करुन कार्यारंभ आदेश देणे आवश्यक आहे. निविदा प्रक्रीया २३ फेब्रुवारी, २०१८ पर्यंत पूर्ण न झाल्यास योजनेची मान्यता रद्द समजण्यात येईल.

८) योजनेची कामे १५ मार्च, २०१८ पर्यंत पूर्ण करुन योजनेतून पाणी पुरवठा सुरु होणे आवश्यक आहे. तथापि, या दिनांकापर्यंत योजनेतून पाणी पुरवठा सुरु न झाल्यास योजनेची मान्यता रद्द करण्यात येईल.

९) विभागीय आयुक्त, अमरावती यांनी कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, यवतमाळ यांच्याकडे सदर योजनेकरिता योजनेच्या सुरुवातीस ५०% इतका निधी द्यावा. उर्वरित ५०% निधी योजना कार्यान्वित झाल्यानंतर देण्यात यावा.

१०) योजनेतून यवतमाळ शहरास दरडोई दर दिवशी ५० लिटर पाणी उपलब्ध होईल या प्रमाणे नियोजन करावे.

११) प्रस्तुत उपाययोजनेसाठी वापरण्यात आलेले फ्लोटींग पंप (Floating Pump) व HDPE पाईप्स धरणातील पाणीसाठा संपूष्टात आल्यानंतर सदर पंप व पाईप्स काढून ठेवून अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, अमरावती यांच्या ताब्यात ठेवणे आवश्यक आहे. जेणेकरुन आवश्यकतेनुसार पुढील टंचाई कालावधीत त्यांचा वापर याच ठिकाणी अथवा अन्य ठिकाणी करणे शक्य होईल.

१२) योजनेचे काम मुदतीत पूर्ण होणे आवश्यक असल्याने योजनेच्या निविदा प्रक्रीयेपासून ते योजनेतून पाणीपुरवठा सुरु होईपर्यंत आठवडयाच्या प्रत्येक सोमवारी प्रगती अहवाल शासनास पाठविण्यात यावा.

२. याबाबत होणारा खर्च मागणी क्र. सी-६, २२४५ नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य, ०१-अवर्षण, १०२ पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, ९१ - राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकानुसार खर्च, (९१)(०१) पिण्याच्या पाण्याच्या आकस्मिक निकडीच्या पुरवठा (२२४५००९३) (दत्तमत) (वेतनेत्तर) - ३१, सहाय्यक अनुदाने या लेखाशिर्षाखालील तरतूदीमधून भागविण्यात यावा व त्याखाली अंतिमत: खर्ची टाकण्यात यावा.

३. हा शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ नागरी व ग्रामीण क्षेत्रातील विहित आर्थिक व भौतिक निकषाबाहेरील तात्पुरत्या पाणी पुरवठा योजना / उपाययोजनांना प्रशासकीय मंजूरी देण्यासाठी स्थापन केलेल्या सचिवस्तरीय स्थायी समितीच्या दिनांक ०५.०२.२०१८ रोजी झालेल्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०२०५१६५३५१४४२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Mahesh Bhagwan Sawant

Digitally signed by Mahesh Bhagwan Sawant
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply and Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d1f670a17d77c8ddff69694de2a07b7ff855dafef954aefa82ca28bd6cc6adb6, cn=Mahesh Bhagwan Sawant
Date: 2018.02.06 12:41:17 +05'30'

(म. भ. सावंत)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखाकार, (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई
२. महालेखाकार, (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-२, नागपूर
३. अपर मुख्य सचिव, (म.व पु.) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
४. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
५. प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
६. सचिव, ग्रामविकास आणि जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
७. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
८. विभागीय आयुक्त, अमरावती
९. जिल्हाधिकारी, यवतमाळ
१०. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, अमरावती,
११.कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, यवतमाळ,
१२. मुख्याधिकारी, यवतमाळ नगरपरिषद, यवतमाळ
१३. मा.अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांचे स्वीय सहायक
१४.उप सचिव (पापु १४) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांचे स्वीय सहायक
१५.पापु १४ (निवडनस्ती)